**नियमित दिवाणी दावा क्रमांक 122/2016**

**ललित विरूध्द भिकाजी आणि इतर**

**निशाणी क. 5 वर आदेश**

अर्ज, शपथपत्र आणि प्रतिवादींचा जबाब वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

2. मौजे पालखेड, ता. निफाड, जि. नाशिक येथील शेतजमीन गट क्रमांक 1 एकुण क्षेत्र 2 हेक्टर 79 आर पैकी पश्चिम–दक्षिण कोप–यातील 23 आर जीच्या चतु:सीमा पुर्वेस – याच मिळकतीतील उर्वरीत क्षेत्र, पश्चिमेस – पालखेड शिरवाडे रस्ता, दक्षिणेस – पालखेड रानवड रस्ता आणि उत्तरेस – याच मिळकतीतील क्षेत्र ही वादीची जमीन आहे. ती मिळकत मुळची लहानु रामजी थेटे, यशवंत दगु थेटे, आण्णासाहेब माधवराव शिंदे, भिकाजी ठमाजी थेटे, संपत दाजी थेटे व शिवाजी विठोबा थेटे यांच्या मालकीची होती. त्या मिळकतीत लहानु थेटे यांचे एकुण 92 आर, यशवंत थेटे यांचे 92 आर आणि उर्वरीत चौघांचे 95 आर क्षेत्र होते. सन 1996 मध्ये त्यांच्यात वाटप झाले. वाटपाने उत्तरेकडील क्षेत्र लहानु, त्याचे दक्षिणेकडील क्षेत्र यशवंत, त्याचे दक्षिणेकडील क्षेत्र उर्वरीत चौघांच्या हिस्स्यास देण्यांत आले. वाटपाची नोंद क्रमांक 1773 प्रमाणे त्याला अंमल देण्यांत आला. वाटपानंतर प्रतिवादी क्रमांक 1 व इतर 4 यांच्या हिस्स्यास आलेल्या दक्षिणेकडील 95 आर क्षेत्रात 1/3 हिस्सा आण्णासाहेब शिंदे यांचा होता. प्रतिवादी क्रमांक 2 वगळता इतर हिस्सेदारांची तक्रार नव्हती. आण्णासाहेब शिंदेंचा हिस्सा 1/3 नसुन 1/4 म्हणजे फक्त 23 इतकाच आहे, असे प्रतिवादी क्रमांक 1 चे म्हणणे होते. त्यामुळे आण्णासाहेब याने पिंपळगांव न्यायालयांत रे.मु.नं.129/99 दाखल केला. त्याची चौकशी होवुन त्याचा निकाल वादीच्या विरोधात गेला. परंतु अपील क्रमांक 102/04 चा निकाल वादीच्या हक्कात झाला आहे. माननीय जिल्हा न्यायालयाने आण्णासाहेब शिंदे यांचे 23 आर क्षेत्र आहे, असे ठरवुन दिले आहे. त्या दाव्यात किंवा अपीलात प्रतिवादींनी ती जमीन वादीच्या ताब्यात आहे, याबाबत वाद केला नाही. त्या जमीनीला वादींना कुंपण करायचे असल्याने वादींच्या कामात प्रतिवादी अडथळा करत आहेत. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल झाला आहे.

3. प्रतिवादी हजर झाले. त्यांनी निशाणी क्रमांक 27 वर जबाब आणि प्रतिदावा दाखल

केला. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे जमीन गट क्रमांक 1 च्या वादीने दिलेल्या चतु:सीमा हया बरोबर असुन त्यापैकी 23 आर जमीनीच्या म्हणजे दावा मिळकतीच्या वादीने दिलेल्या चतु:सीमा हया काल्पनिक स्वरूपाच्या आहेत. वादीच्या कुटुंबाचा दावा मिळकतीशी केवळ कागदोपत्री / पोकळीस्त असा संबंध आहे. दावा मिळकत ही वादीचे पुर्वज किंवा वादींच्या कधीही ताब्यात नव्हती. फेरफार नोंद क्रमांक 1773 ही बेकायदेशीर असुन तीच्या आधारे वादी दावा मिळकतीवर स्वतःचा हक्क सांगत आहेत. त्या 95 आर जमीनीत आण्णासाहेब शिंदे यांचा हिस्सा नव्हता, त्यामुळे त्यांचे वारस म्हणुन 1/3 किंवा 1/4 वादीचा हिस्सा असण्याचे कोणतेही कारण नाही. 95 आर जमीनीत वादीचा हिस्सा आणि ताबा आहे, असा निर्णय कोणत्याही सक्षम न्यायालयाने आजपर्यन्त दिला नाही. तसेच वादीची 23 आर जमीन ही स्वतंत्र आणि वेगळी असल्याचे कोणत्याही सक्षम न्यायालयाने आजपर्यन्त ठरवुन दिले नाही. वादी हा अपील क्रमांक 102/04 च्या आधारे त्या जमीनीवर हक्क सांगण्याचा बेकायदेशीर आणि लबाडीचा प्रयत्न करत आहे. दावा मिळकत जमीन गट क्रमांक 1 च्या संपुर्ण क्षेत्राच्या तीन बाजुस रस्ता असल्याने त्यापैकी काही भाग रस्त्याखाली गेला असुन काही भाग मुसलमान समजाचे कब्रस्तान, पालखेड गावची स्मशानभुमी आणि गावतळे याचेखाली गेली आहे. फेरफार नोंद क्रमांक 1773 ही कागदोपत्री असुन भौगोलिक परिस्थितीशी विसंगत आहे. दावा मिळकत ही कधीही वादीच्या ताब्यात नव्हती व नाही. त्यामुळे दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन वादीचा हिस्सा त्यास प्रत्यक्ष ताब्यात मिळेपर्यन्त दावा मिळकतीत वादीने खड्डे खोदणे, तारकुंपण करणे किंवा दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारे कब्जा प्रस्थापित करू नये, अशी निरंतरची ताकीद देण्याची मागणी केली.

4. माझे विचारार्थ निर्माण झालेले मुद्दे, त्यावरील निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | वादीने प्रथमदर्शनी प्रकरण त्याचे बाजुने आहे, असे सिध्द केले काय ? | होकारार्थी. |
| 2. | वादीने, न्यायाचा तौलनिक तराजू त्याचे बाजूने आहे, असे सिध्द केले काय ? | होकारार्थी. |
| 3. | मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर केला तर वादीचे नुकसान होईल, असे वादीने सिध्द केले काय ? | होकारार्थी |

4. आदेश कोणता ? अंतिम आदेशानुसार...

## कारणमिमांसा

**मुद्दा कमांक 1 ते 3 करीता :–**

5. सोयीसाठी व पुनरावृत्ती टाळण्याकरीता सदर मुद्दयांचे विवेचन एकत्रित केले आहे.

6. दावा मिळकत जमीन गट कमांक 1 शिवार पालखेड पैकी पश्चिम–दक्षिण कोप–यातील 23 आर जमीन ही वादीची होती, असे दाखविण्यासाठी वादीने रे.मु.नं. 129/99 मधील निशाणी कमांक 1 आणि निशाणी कमांक 13 वरील प्रतिवादींचा जबाब व न्यायनिर्णयाचा आधार घेतला. त्या दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तो दावा वादीचे वडील आण्णासाहेब माधवराव शिंदे यांनी प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी कमांक 1 आणि प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी कमांक 2 ते 4 व 6 ते 9 यांच्या वडीलांविरूध्द दाखल केला होता. त्या दाव्यात वादीच्या 95 आर क्षेत्रापैकी 1/3 म्हणजे 32 आर क्षेत्रावर वादीची मालकी व ताबा प्रतिवादींकडुन मागितलेला होता. पुढे त्या दाव्यात अर्ज देवुन ताब्याची मागणी वादीने मागे घेतली. त्या दाव्याचा निकाल वादीच्या विरूध्द गेल्याने त्याने माननीय जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले. दिनांक 12/02/2015 रोजी माननीय जिल्हा न्यायालयाने अपील मंजुर करून वादीचा 95 आर जमीनीत 1/3 हिस्सा नसुन 1/4 हिस्सा आहे व तो 23 आर एवढा येतो, असा निकाल दिला.

7. रे.मु.नं. 129/99 मधील वादीचे कथन व प्रतिवादी कमांक 1 चा लेखी जबाब यावरून असे सिध्द होते की, जमीन गट कमांक 1 शिवार पालखेड पैकी 95 आर जमीनीत वादीचे वडील आण्णासाहेब शिंदे यांचा 1/4 हिस्सा म्हणजे 23 आर एवढा आहे. त्या जमीनीत वादीचा हिस्सा नाही, असे प्रतिवादींचे कथन फेटाळून लावण्यासाठी प्रतिवादींची रे.मु.नं.129/99 मधील लेखी कैफीयत व दिवाणी अपील कमांक 219/05 मधील माननीय जिल्हा न्यायालयाने दिलेला दिनांक 12/02/2015 रोजीच्या न्यायनिर्णयाचा आधार घेता येईल. दिवाणी अपीलातील निकालावरून त्या जमीनीत वादीचा 23 आर एवढा हिस्सा आहे, ही बाब प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

8. दावा मिळकत 23 आर जमीनीवर वादीचा मालकी हक्क प्रथमदर्शनी दिसुन आल्याने आता त्यावरील ताब्यासंदर्भातील दस्तऐवज पडताळुन पाहणे गरजेचे आहे. ती 23 आर जमीन वादीच्या ताब्यामध्ये आहे, असे दाखविण्यासाठी वादीने रे.मु.नं.129/99 मधील प्रतिवादी कमांक 1 व प्रतिवादी

क्रमांक 3 ते 4 आणि प्रतिवादी क्रमांक 6 ते 9 यांच्या वडीलांनी दाखल केलेल्या लेखी कैफीयतीचा आधार घेतला. त्याचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, त्या जमीनीत वर नमुद केल्याप्रमाणे आण्णासाहेब शिंदे यांचा 1/4 हिस्सा असुन वादीच्या हिस्स्याचे क्षेत्र त्याचे चुलत भाउ प्रताप शिंदे, व्दारकाबाई शिंदे आणि अन्नपुर्णाबाई शिंदे यांचे ताब्यात आहे. म्हणजे प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादीचे क्षेत्र हे वादीच्या किंवा प्रतिवादींच्या ताब्यात नसुन ते इतरांच्या ताब्यात आहे.

9. रे.मु.नं.129/99 मध्ये वादीचे कथन व प्रस्तुत दाव्यातील कथन हे सारखेच असुन त्याउलट त्या दाव्यातील प्रतिवादींचे कथन हे प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादींच्या कथनाशी सुसंगत नाही. वाटप झाले होते, हे वादीचे म्हणणे प्रतिवादींनी वेळोवेळी नाकारले आणि प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी हे वाटपाला अंमल देण्यासाठी ज्या फेरफार नोंद क्रमांक 1773 चा आधार घेत आहेत, त्या नोंदीचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, त्या जमीनीचे वाटप झाले होते. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादीचा हिस्सा ज्या तीन व्यक्तींच्या ताब्यामध्ये आहे, त्या तीनही व्यक्ती प्रस्तुत दाव्यात वादी किंवा प्रतिवादी नाहीत. त्यामुळे ती जमीन प्रतिवादींच्या किंवा त्या तीनही व्यक्तींच्या ताब्यामध्ये नसुन वादीच्याच ताब्यात आहे, असा एकमेव निष्कर्ष निघतो. वादीने 23 आर जमीनीवर त्याचा मालकी हक्क व ताबा हा अपील क्रमांक 219/05 मधील निकालाच्या आधारे तसेच फेरफार नोंद क्रमांक 1773 च्या आधारे प्रथमदर्शनी सिध्द केला आहे. ती जमीन प्रतिवादींच्या ताब्यामध्ये नाही, हे प्रथमदर्शनी स्पष्ट दिसुन येते. अशा परिस्थितीत, त्या जमीनीचा उपभोग घेण्यापासुन वादीला थांबविणे म्हणजे त्याचे कायदेशीर अधिकारावर अतिक्रमण करण्यासारखे होईल. वादीचा दावा मिळकतीवर मालकी व ताबा प्रथमदर्शनी दिसुन येत असल्याने त्या जमीनीचा उपभोग हवा तसा घेण्याचा वादीस अधिकार आहे. प्रस्तुत अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादींना नव्हे तर वादीचेच नुकसान होणार आहे. म्हणुन वर नमुद चर्चा लक्षात घेता, मुद्दा क्रमांक 1 ते 3 चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक 4 करीता</u> :–**

10. मुद्दा क्रमांक 1 ते 3 चे निष्कर्ष लक्षात घेता, मुद्दा क्रमांक 4 चे उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

1. अर्ज (**नि.क.5**) अंशतः मंजुर करण्यांत येतो.

2. प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 व 6 ते 9 यांनी अथवा त्यांच्या वतीने अन्य कोणीही मौजे पालखेड, ता. निफाड, जि. नाशिक येथील शेतजमीन गट क्रमांक 1 मधील पश्चिम–दक्षिण कोप–यातील 23 आर क्षेत्रातील वादीचे कब्जा वहिवाटीस हिल्ला हरकत करून अडथळा होईल, असे कोणतेही कृत्य करू नये, असा तात्पुरता मनाई हुकूम, दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो, देण्यांत येतो.

सही–––
( विजय सी. गवई)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
पिंपळगांव (ब)

दिनांक :– 02/05/2017.